# संकलित मूल्यमापन चाचणी क्र.2 - 2018-19

## इयत्ता : 7 वी

## विषय : मराठी (मराठी माध्यम)

**विद्यार्थ्यांचे नांव :** ____________________ **हजेरी क्रमांक :** __________

**शाळेचे नांव :** ____________________ **तुकडी :** __________

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **दिनांक :**

**एकूण गुण :** **प्राप्त गुण :**

| प्रश्न क्रमांक | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | तोंडी | एकूण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 10 | 5 | 5 | 5 | 10 | 60 | |

प्र.१ ला : शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) __________ २) __________

३) __________ ४) __________

५) __________ ६) __________

७) __________ ८) __________

९) __________ १०) __________

**प्र.२ रा : हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

| | | |
|---|---|---|
| आजोबा | :- | अरे! सुधीर केव्हा आलास? आजचा प्रवेश असा शांत कसा? |
| सुधीर | :- | आजोबा, काव्यप्रतिभा वाढवा, म्हणजे काय हो? |
| आजोबा | :- | कोणी सांगितलं रे तुला हे? |
| सुधीर | :- | आज शाळेत बाईनी आम्हांला 'काव्य प्रतिभा वाढवण्यासाठी तुम्ही केलेले प्रयत्न' हा प्रकल्प दिलाय. मला तर ताणच आलाय. |
| आजी | :- | अरे, फार सोपं आहे ते! कविता करण्याची, समजून घेण्याची आपली आकलनशक्ती वाढवणं, म्हणजे काव्यप्रतिभा वाढवणं त्यासाठी तू प्रयत्न करायचे आहेस, हेच सांगितलय बाईनी. |
| सुधीर | :- | पण मी हे कसं करू? |
| आजोबा | :- | अरे, काळजी नको करूस, त्यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करू, म्हणजे तुझी काव्यप्रतिभाही वाढेल आणि कविता करणं, कवितेचं आकलन होणं म्हणजे काय हेही तुला समजेल. |
| आजी | :- | तुम्ही हो काय प्रयत्न करणार? |
| आजोबा | :- | आपण आजपासून कवितेत संभाषण करायचं, ते तो कागदावर उतरून घेईल. म्हणजे त्याला कविताही समजेल अन् त्याचा प्रकल्पही पूर्ण होईल. |
| आई | :- | सुधीर हातपाय धू अन् दूध घे. |
| सुधीर | :- | आजी मी कागद अन् वही घेतो. आताच आपण सुरूवात करू. |
| | | (आजी दिवा लावते व मोठ्याने 'शुभंकरोती' म्हणते) |
| आजी | :- | घरामध्ये लावते सांजवात, भाजी करते आता कांद्याची पात. |

१) सुधीरचा घरातील प्रवेश कसा होता? **(गुण १)**

अ) शांत ब) लगबगीने

क) घाईघाईने ड) रडत

२) संभाषणामध्ये ताण कोणावर आला आहे? **(गुण १)**

अ) आजी ब) आजोबा

क) सुधीर ड) आई

३) ''तू प्रयत्न करायचे आहेस'' हे वाक्य कोणी कोणास म्हटले? **(गुण १)**

अ) आजोबांनी सुधीरला    ब) आजींनी सुधीरला

क) आईनी सुधीरला    ड) बाईनी सुधीरला

४) काव्यप्रतिभा वाढविण्याकरीता तुमच्या मते काय करायला पाहिजे? **(गुण २)**

______________________________________________

______________________________________________

**प्र.३ रा – ही कविता वाच व खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (योग्य पर्याय निवड)**

दूर गेले बाबा अन दूर गेली आई
थकलेल्या आजीला मग बाळ बिलगूनी राही
कसा कुठूनी नियतीचा फेरा बघ आला
टाटा केला आईबाबा अन् तो शेवटचा झाला
लेखणी अन् खाऊ बाळाचा रस्त्यातच सांडून जाई.
थकलेल्या जीवाचा सरला आधार
झुकलेल्या खांद्यावर पडला मोठा भार
शिणलेल्या डोळ्यात फक्त बाळ भरूनी राही

१) बाळ कोणाला बिलगुन राहते? **(गुण १)**

अ) आजी    ब) बाबा

क) आई    ड) आबा

२) बाळाच्या आईबाबाच्या बाबतीत काय घडले असेल? **(गुण १)**

अ) दूर गेले असतील    ब) गावाला गेले असतील

क) मरण पावले असतील    ड) खूप थकले असतील

३) 'मिठी मारणे' या शब्दाला कोणता पर्यायी शब्द कवितेत आला आहे? **(गुण १)**

अ) आलिंगन देणे    ब) बिलगणे

क) गळाभेट घेणे    ड) कवटाळणे

४) बाळाची सगळी जबाबदारी कोणावर आली असेल? **(गुण १)**

अ) बाबा ब) बाळ

क) आई ड) आजी

५) खालीलपैकी कोणता प्रसंग कवितेतून दिसून येतो? **(गुण १)**

अ) आनंदाचा ब) सुखाचा

क) दुःखाचा ड) हसण्याचा

**प्र.४ था : हा उतारा वाच व त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.**

८-१० वर्ष झाली असतील त्या घटनेला. एका शाळेत मी विचारल, ''श्यामची आई ज्यांनी वाचलं नाही त्यांनी हात वर करा.'' प्रश्न उलटा होता त्यामुळे कुणाचाच हात आधी वर झाला नाही. मला खूप आनंद झाला. पुस्तक सर्वांनी वाचलंय अस समजून गप्पा मारायला लागलो आम्ही! तरी कुणी बोलेना. मग मला जरा शंका आली. नेहमीचा प्रश्न विचारला ''कुणी कुणी वाचलय पुस्तक?'' एक हात वर आला, तरी मला आनंद झाला. ''मुला पुस्तक का आवडल?'' मी अगदी भावुक झाले होते. मला मी आठवले. पुस्तक वाचताना माझ्या डोळ्यातून घळाघळा पाणी तेव्हाही वाहिलं होतं नि आजही वाहतं. किती भारावलेपण त्यातली भाषा, ती आई, ते वातावरण..... मी भूतकाळात रमलेली असतांना माझ्या कानावर वाक्य आलं, ''मला आवडल नाही पुस्तक.'' मला संताप अनावर झाला. ''तुला काही कळतं का? अरे ते पुस्तक नाही, जीवनप्रणाली आहे मुर्ख. मी स्वतःला शांत केल. ''का रे असं म्हणतोस?'' थोडा वेळ असाच गेला ''अशी कधी आई असते! इतकं समजून सांगायला तिला वेळ कुठे आहे?'' आता मात्र मी अंतर्मुख झाले. जर आज श्याम आम्हाला वेगळा दिसत असेल तर त्यामागे आम्हीच जबाबदार आहोत ना!

१) खालीलपैकी नकारार्थी वाक्य कोणते? **(गुण १)**

अ) अरे ते पुस्तक नाही.

ब) ''श्यामची आई ज्यांनी वाचलं नाही त्यांनी हात वर करा.''

क) मला खूप आनंद झाला.

ड) तुला काही कळतं का?

२) अशी कधी आई असते! या वाक्यातील मुलांची खंत कोणती? **(गुण १)**

अ) आई सतत रागावते   ब) आई लाड करत नाही

क) आई मुलाला वेळ देत नाही   ड) आई सिनेमा दाखवत नाही

३) मुलाचं वाचन कमी झालं हे दर्शविणारे वरील उताऱ्यातील वाक्य कोणते? **(गुण १)**

अ) मी अगदी भावूक झाले होते?   ब) मला आवडत नाही पुस्तक

क) एक हात वर आला   ड) मला जरा शंक आली

४) तुला वाचायला आवडते का? की नाही, आवडत असल्यास/नसल्यास मत व्यक्त कर?

**(गुण २)**

___

___

___

**प्र.५ वा : २६ जानेवारी निमित्त शाळेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या बाबत खाली काही माहीती दिली आहे. त्या आधारे कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका तयार कर. (गुण ५)**

| |
|---|
| दि.२६ जानेवारी २०१९ रोजी आपल्या शाळेत ध्वजारोहणाचा कार्यक्रम राहणार आहे. सकाळी ७.३० वाजता शाळेचे मुख्याध्यापक श्री.कैलास सातपुते हे ध्वजारोहण करणार आहे. या प्रसंगी शाळाव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन सालफळे, उपाध्यक्षा लिनाताई बावणे ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी ११ वाजता आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तर दुपारी २ वाजता रांगोळी स्पर्धेचे आयोजन शाळेच्या व्हरांड्यात केले आहे. सायंकाळी ६ वाजता नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व स्पर्धाचे परीक्षक म्हणून शाळेचे शिक्षक श्री.पंकज भारती व शिक्षिका विद्याताई पवार राहणार आहे. या सर्व कार्यक्रमाचे स्थळ शाळा असून सर्वांनी या कार्यक्रमाला हजर राहावे यासाठी विद्यार्थी समिती यांनी विनंती तसेच आवाहन केले आहे. |

प्र.६ वा – खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव. **(गुण १०)**

अ) खालील नामांचे वर्गीकरण करा. **(गुण २)**

रिना, नदी, रमेश मुलगा

| | | |
|---|---|---|
| सामान्य नाम | | |
| विशेष नाम | | |

ब) खालील रिकाम्या जागेसाठी समुह दर्शक शब्द निवडा . **(गुण २)**

१) आकाशात पक्षांचा ____________ उडताना दिसत आहे.

३) रामाने दिवस भरात २५ पोत्यांची ____________ ट्रक मध्ये भरली.

(थप्पी, रास, थवा, कळप)

क) 'नागमोडी' व 'हुशार' या विशेषणांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य लिही. **(गुण २)**

१) ____________

२) ____________

ड) पुढील वाक्याचा प्रकार ओळखा. **(गुण १)**

तो रोज सकाळी लवकर उठतो.

अ) केवल वाक्य ब) निन्मवाक्य क) संयुक्त वाक्य

इ) दोन्ही जागी एकच क्रियापद लिहून वाक्य अर्थपूर्ण कर. **(गुण १)**

आईने सर्वांना खाऊ ____________ (वाटणे)

त्यामुळे सर्वांनाच बरे ____________ (वाटणे)

फ) योग्य विशेषणे लावून वाक्य पुन्हा लिही. **(गुण २)**

(उंच, चपळ, वेगाने, हुशार)

१) सरिता ____________ मुलगी आहे

२) नदी ____________ वाहते

३) हिमालय पर्वत ____________ आहे

४) घोडा फारच ____________ आहे

**प्र.७ वा – खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही.** (गुण ५)

प्रविणच्या शाळेची रमण विज्ञान केंद्र नागपूर येथे एक दिवसाची सहल जाणार होती. मुख्याध्यापकांनी प्रविणला बोलवून सहलीमध्ये वागण्याचे नियम व शिस्त याबाबत सूचना दिल्या. प्रविणनेही सरांना काही प्रश्न विचारले.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**प्र.८ वा – खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना करून तुझ्या शब्दात लिही. (गुण ५)**

१) मी चंद्रावर गेलो तर ......

२) सूर्य संपावर गेला तर

३) फळा बोलू लागला तर

४) पाऊस पडलाच नाही तर

**प्र.९ वा – पत्रलेखन** **(गुण ५)**

टीव्हीवरील ‘सारेगमप’ गायन स्पर्धेकरीता तुझ्या शाळेतील केदारची निवड झाल्याबाबत त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिही.

# तोंडीकाम

**मांजरखेड दि.७ :** मन, मंदू आणि मनगट मजबूत असेल तर क्षेत्र कुठलेही असो त्यात व्यक्तीला प्रावीण्य प्राप्त होतेच. भारतीय खाद्य निगममधील मॅनेजर पदावर कार्यरत असलेल्या छाया भट ह्या महिलेने क्रिकेट, बॅडमिंटन, ॲथॅलेटिक, पॉवरलिफ्टिंग आदी विविधांगी खेळात आपली ताकद दाखवित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी छाप सोडली. एवढेच नव्हे तर या प्रवासादरम्यान आडकाठी ठरलेल्या कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला चित करत त्या खऱ्या अर्थाने चॅम्पियन ठरल्या.

मूळच्या मध्यप्रदेश येथील रहिवासी असलेल्या छाया करंदीकर (भट) यांना पहिल्यापासून ज्यूदो, क्रिकेट, थाळीफेक, बॅडमिंटन या क्रीडाप्रकारात रूची होती. १९८५ ते १९९५ या दरम्यान ॲथलेटीक या क्रीडाप्रकारात चमकदार कामगिरी करत तब्बल २६ पेक्षा जास्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजय संपादन केला. या क्रीडा स्पर्धेतील यशाची नोंद मध्यप्रदेश राज्य शासनाने घेतली व त्यांचा 'विक्रमादित्य' पुरस्काराने सन्मान केला. खेळातील मौल्यवान योगदान म्हणून कोषागार विभागात नोकरी पण दिली. त्यांनी १९९० पासून धावपटू सोबत पॉवरलिफ्टींग खेळात सराव सुरू ठेवला.

१) व्यक्तीला प्रावीण्य प्राप्त करण्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत? **(गुण १)**

२) छायाताई खऱ्या चॅम्पियन ठरल्या असे का म्हटले आहे? **(गुण १)**

३) 'विक्रमादित्य पुरस्कार' मिळवण्यासाठीची छायाताईची मेहनत तुला कशावरून लक्षात येते? **(गुण १)**

४) आपल्या मेहनतीच्या बळावर यश मिळवलेल्या आपल्या परिसरातील एका व्यक्तीबद्दल माहिती लिही. **(गुण २)**

**नमूना संकलित मूल्यमापन चाचणी क्र.२**
**सत्र २०१८-१९**
**विषय : भाषा (मराठी)**
**इयत्ता : ६ वी**

# शिक्षक सूचना पुस्तिका (संच क्र.१)

प्र.१ ला : शब्द ऐकून लिही. (गुण ५)

क्षेत्र :- लेखन (श्रुतलेखन)

उद्दिष्ट :- जोडाक्षरविरहीत व जोडाक्षरसहीत शब्दांचे लेखन तपासणे.

सूचना :-

- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलंग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

शब्द :-

| | |
|---|---|
| १) औरंगाबाद | २) वातावरण |
| ३) घाबरगुंडी | ४) सौंदर्य |
| ५) दृष्टी | ६) किल्ला |
| ७) आसक्ती | ८) श्रेय |
| ९) हॉटेल | १०) लॉलीपॉप |

गुणदान :- प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे. हा प्रश्न तपासताना शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावा.

उदा. 'दृष्टी' ऐवजी 'दृषटी' किंवा 'आसक्ती' ऐवजी 'आसकती'असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

प्र.२ रा : हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)

१) अ) शांत (गुण १)

२) क) सुधीर (गुण १)

३) ब) आजीने सुधीरला (गुण १)

४) काव्यप्रतिभा वाढविण्याकरिता त्याने चार वाक्यात स्वतःचे मत लिहिल्यास प्रत्येकी एक स्वतंत्र वाक्यास एक गुण द्यावा. (गुण २)

प्र.३ रा : ही कविता वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)

१) अ) आजी (गुण १)

२) क) मरण पावले असतील (गुण १)

३) ब) बिलगणे (गुण १)

४) क) आजी (गुण १)

५) क) दुःखाचा (गुण १)

प्र.४ था – ही उतारा वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)

१) अ) अरे ते पुस्तक नाही (गुण १)

२) क) आई मुलाला वेळ देत नाही (गुण १)

३) क) एक हात वर आला. (गुण १)

४) वाचन आवडत असल्यास का आवडते व वाचन आवडत नसल्यास का आवडत नाही याबाबत त्याचे मत किमान दोन वाक्यात लिहिल्यास २ गुण द्यावे. विद्यार्थ्याने स्वभाषेचा वापर केल्यास स्विकार करावा. (गुण २)

प्र.५ वा – २६ जानेवारी निमित्त शाळेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याबाबत खाली काही माहिती दिली आहे. त्याआधारे कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका तयार कर. (गुण ५)

क्षेत्र :– स्वअभिव्यक्ती

उद्दिष्ट :– लेखी स्वअभिव्यक्ती तपासणे.

गुणदान :–

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | दिलेल्या माहितीचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. निमंत्रण पत्रिकेची सुरवात आणि शेवट आहे. |
| ४ | दिलेल्या माहितीचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. निमंत्रण पत्रिकेची सुरवात आणि शेवट. |
| ३ | दिलेल्या माहितीचा संदर्भ लक्षात घेऊन निमंत्रण पत्रिका तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| २ | दिलेल्या माहितीचा संदर्भ लक्षात घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळीत असू शकेल, त्रोटक लेखन. |
| १ | सुटी–सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |

प्र.६ वा – खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव. (गुण १०)

अ) . (गुण २)

| | | |
|---|---|---|
| सामान्य नाम | नदी | मुलगा |
| विशेष नाम | रिना | रमेश |

ब) १) थवा (गुण १)

२) थप्पी (गुण १)

क) 'नागमोडी' व 'हुशार' या विशेषणांचा वापर करून योग्य असे दोन वाक्य (गुण २)

लिहिल्यास प्रत्येकी एका वाक्यास एक असे दोन वाक्यास २ गुण देण्यात यावे.

ड) अ) केवलवाक्य (गुण १)

इ) आईने सर्वांना खाऊ <u>वाटला</u> (गुण १)

सर्वांनाच बरे <u>वाटले</u>.

फ) १) सरिता हुशार मुलगी आहे. (गुण २)

२) नदी वेगाने वाहते.

३) हिमालय पर्वत उंच आहे.

४) घोडा फारच चपळ आहे.

ग) प्रथमच केलेला विमान प्रवास माझ्यासाठी अविस्मरणीय राहीला. (गुण १)

प्र.७ वा – खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही. (गुण ५)

क्षेत्र :– स्व–अभिव्यक्ती (लेखन)

उद्दिष्ट :– स्व–अभिव्यक्ती तपासणे

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | • दिलेल्याप्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊन संवाद लेखन केले आहे. संवादाला सुसंगत सुरूवात आणि शेवट आहे.<br>• संवाद खुलविण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत.<br>• पात्रांची व्यक्तिरेखा विकसित केलेली दिसते.<br>• दिलेल्या तपशिलांची सविस्तर मांडणी करून लेखन खुलविण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• विरामचिन्हांचा योग्य वापर केला आहे. |
| ४ | • दिलेल्या प्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊन संवाद लेखन केले आहे.<br>• संवादाला सुसंगत सुरूवात आणि शेवट आहे.<br>• पात्रे व त्यांची भूमिका यांचा फारसा विस्तार केलेला नाही.<br>• दिलेल्या तपशिलांचा मर्यादित विस्तार केला आहे. |
| ३ | • दिलेल्या प्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊन संवाद पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाक्यरचना काही ठिकाणी विस्कळीत असू शकते.<br>• दोन व्यक्तिरेखा काही प्रमाणात उभ्या करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• लिखाणात काही ठिकाणी सलगता, सुसंगतपणा नाही. त्यामुळे संपूर्ण संवादाचा, एकत्रित विचार करता अर्थबोध नाही. |

| | |
|---|---|
| २ | • दिलेल्या प्रसंगाचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• लिहिताना दिलेल्या सर्व तपशिलांचा वापर नाही. |
| १ | दिलेल्या प्रसंगाचा सुटा सुटा विचार करून वाक्यांचे लेखन, वाक्यात सलगता नाही. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा शब्दलेखन किंवा अर्धवट वाक्य. |

प्र.८ वा – खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना करून तुझ्या शब्दांत लिही. (गुण ५)

क्षेत्र :– स्व–अभिव्यक्ती (लेखन)

उद्दिष्ट :– स्व–अभिव्यक्ती तपासणे

गुणदान :–

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | • लेखनाला सुसंगत सुरूवात व शेवट आहे.<br>• वाक्यरचना नीट आहे.<br>• कल्पनांचा विस्तार नेमका व विषयाला धरून झाला आहे.<br>• लेखनात बारकावे व तपशील दिल्याने लेखन प्रभावी झाले आहे. |
| ४ | • लेखनाला सुरूवात व शेवट अशी रचना करण्याचा प्रयत्न.<br>• वाक्यरचना नीट आहे. (एक–दोन ठिकाणी विस्कळीत असू शकते)<br>• काही कल्पनांचा विस्तार सविस्तर केलेला आहे. |
| ३ | विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन केलले लेखन, ज्यात<br>• वाक्यरचना काही ठिकाणी नीट आहे.<br>• लेखन मुद्देसूद करण्याचा प्रयत्न दिसतो.<br>• कल्पना विस्तार मर्यादित व अगदीच थोडा केलेला आहे. |
| २ | विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन केलले लेखन, ज्यात |

| | |
|---|---|
| | • वाक्यरचना तुटक आहे.<br>• विषयाला धरून वरवरचे, ढोबळमानाने केलेले लेखन, लेखनात विस्कळीतपणा आहे. |
| १ | विषयाचे शीर्षक वापरून केलेले वाक्यांचे सुटे सुटे लेखन, काही शब्द बदलून केलेले वाक्यांचे परत परत लेखन. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या विषयाचा विचार न करता केलेले असंबद्ध लेखन किंवा केवळ शब्दलेखन. |

प्र.९ वा – टिव्हीवरील ‘सारेगमप’ गायन स्पर्धेकरीता तुझ्या शाळेतील केदारची निवड झाल्याबाबत त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिही. (गुण ५)

क्षेत्र :– स्व–अभिव्यक्ती (लेखन)

उद्दिष्ट :– स्व–अभिव्यक्ती तपासणे

गुणदान :–

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | • दिलेल्या मुद्यांचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र लिहिलेले आहे.<br>• पत्राला सुसंगत सुरूवात आणि शेवट आहे.<br>• पत्राचा आशय मुद्देसुद आहे. बारकावे व तपशील दिले आहेत.<br>• पत्र लिहिण्यामागची भूमिकाही स्पष्ट केली आहे. |
| ४ | • दिलेल्या मुद्यांचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र लिहिलेले आहे.<br>• पत्राची सुरूवात आणि शेवट सुसंगत आहे.<br>• तपशिलाचा मुद्देसुद विस्तार केला आहे. |
| ३ | • दिलेल्या मुद्यांचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• लेखाचा आशय लक्षात येईल असे मुद्दे मांडलेले आहेत. |

| | |
|---|---|
| | • पत्रातील लिखाण ओघवते नसले तरी वाक्यरचना नीट ाळे. लिखाणात काही ठिकाणी सलगता, सुसंगतपणा नाही.<br>• विषयाचा विस्तार थोडक्यात आणि मर्यादित केलेला आहे. |
| २ | • दिलेल्या मुद्यांचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे,<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• लिहिताना लेखाचा तपशील दिलेला नाही.<br>• पत्राची रचना विस्कळीत आहे. |
| १ | दिलेल्या विषयाचा विचार करून वाक्यांचे सुटे सुटे लेखन. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या संदर्भाचा विचार न करता केलेले असंबद्ध लेखन किंवा केवळ शब्दलेखल. |

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांसाठी सूचना (गुण १०)**

- तोंडी प्रश्न – उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :–**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलांचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसांत चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :–**

- मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे, त्याची उत्तरे तू द्यायचीस.

**वाचनासाठीचे गुणदान :–**

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे पतर वाचन चालेल. |

| | |
|---|---|
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ० | मुलाने उतारा चावण्यात रस दाखविला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |

आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.

**प्रश्न**

१) मन, मेंदू आणि मनगट (गुण १)

२) कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला चित करत छायाताई चॅम्पियन ठरल्या. (गुण १)

३) ॲथलेटीक या क्रीडाप्रकारात २६ पेक्षा जास्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजय संपादन केला. (गुण १)

४) मुलांनी स्वभाषेत दिलेल्या अर्थपूर्ण, सुसंगत वाक्यास प्रत्येकी एक गुण द्यावा. (गुण २)

# संकलित मूल्यमापन चाचणी क्र.2 - 2018-19

## इयत्ता : सातवी

## विषय : गणित (लेखी) (मराठी माध्यम)

**विद्यार्थ्यांचे नांव :** ________________________ **हजेरी क्रमांक :** __________

**शाळेचे नांव :** ________________________ **तुकडी :** __________

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **दिनांक :**

**लेखी गुण : 50** **प्राप्त गुण :**

| प्रश्न क्रमांक | प्र.1 ला अ | प्र.1 ला ब | प्र.2 रा अ | प्र.2 रा ब | प्र.3 रा अ | प्र.3 रा ब | प्र.4 था | प्र.5 वा | प्र.6 वा | प्रात्य. | तोंडी | एकुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | 4 | 6 | 4 | 8 | 2 | 6 | 10 | 4 | 6 | 5 | 5 | 60 | |

**प्र.1 ला - अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. (कोणतेही 4) (गुण 4)**

1) प्रत्येक चौकोनामध्ये लगतच्या बाजूच्या एकूण किती जोड्या असतात?

1) 1 2) 2

3) 4 4) 8

2) वृत्तचितीला अनुक्रमे कडा, शिरोबिंदू व पृष्ठे किती?

1) 2, 0, 3 2) 2, 0, 2

3) 0, 0, 3 4) 0, 2, 3

3) खालीलपैकी अचूक विधान निवडा.

1) खरेदी किंमत - नफा = विक्री किंमत 2) खरेदी किंमत - तोटा = विक्री किंमत

3) विक्री किंमत - खरेदी किंमत = तोटा 4) विक्री किंमत - तोटा = खरेदी किंमत

4) त्रिकोणाचे तिनही कोन दुभाजक

1) एकरूप असतात
2) परस्परांना लंब असतात
3) एकसंपाती असतात
4) नेहमी त्रिकोणाच्या अंतर्भागात छेदतात

5) त्रिकोणाच्या बाजूच्या लंबदुभाजकाच्या संपात बिंदूस काय म्हणतात?

1) अंतरमध्य
2) परिकेंद्र
3) एकरूप बिंदू
4) छेदनबिंदू

6) $(a^m)^n$

1) $a^{m+n}$
2) $a^{m-n}$
3) $\frac{1}{a^{mn}}$
4) $a^{mn}$

**प्र.1 ला - ब) खालील प्रश्न सोडवा. (कोणतेही 3)** **(गुण 6)**

1) द.सा.द.शे. 10 दराने 6000 रूपयाचे एका वर्षाचे व्याज किती होईल?

1) 60 रू.
2) 600 रू.
3) 10 रू.
4) 100 रू.

2) खरेदी 4500, विक्री 5000 रू. असतांना नफा किंवा तोटा किती होईल.

1) तोटा 9500 रू.
2) नफा 9500 रू.
3) तोटा 500 रू.
4) नफा 500 रू.

3) ज्याचे उत्तर $\frac{24}{5}$ येईल असे खालीलपैकी उदाहरण निवडा.

1) $\frac{48}{10}$
2) $\frac{5}{24}$
3) $\frac{24}{10}$
4) $\frac{36}{15}$

4) खालीलपैकी कोणत्या संख्यांचा मसावी 1 नाही?

1) 13, 17
2) 29, 20
3) 40, 20
4) 14, 15

**प्र.2 रा - अ) खालील प्रश्न सोडवा. (कोणतेही 4)** **(गुण 4)**

1) वर्तुळाची त्रिज्या 4 से.मी. असेल तर व्यास किती?

1) 2 x 4 से.मी. 2) $\frac{22}{7}$ x 4 से.मी.

3) $\frac{4}{2}$ से.मी. 4) $\frac{7}{22}$ x 4 से.मी.

2) विशाल कंसाचे माप $290^0$ आहे तर संगत लघुकंसाचे माप किती?

1) $290^0$ 2) $360^0$

3) $180^0$ 4) $70^0$

3) एका आयताची लांबी व रूंदी दुप्पट केली तर त्या आयताची परिमीती मुळ आयताच्या किती पट होईल?

1) दुप्पट 2) निमपट

3) चौपट 4) तिनपट

4) एका चौरसाची बाजू 12 से.मी. असल्यास क्षेत्रफळ किती?

1) 48 से.मी. 2) 144 से.मी.

3) 48 चौ.से.मी. 4) 144 चौ.से.मी.

5) एका चौरसाची बाजू तिप्पट केली क्षेत्रफळ मुळ चौरसाच्या क्षेत्रफळाच्या किती पट होईल?

1) तिप्पट 2) सहापट

3) चौपट 4) नऊपट

6) काटकोन त्रिकोणाचे क्षेत्रफळ =

1) $\frac{1}{2}$ पाया x उंची 2) काटकोन करणाऱ्या बाजूचा गुणाकार

3) $\frac{1}{2}$ काटकोन करणाऱ्या बाजूची बेरीज 4) काटकोन करणाऱ्या बाजूची बेरीज

**प्र.2 रा - ब) खालील कृती पूर्ण करा. (कोणतेही 3)** **(गुण 6)**

1) $\left[\frac{a}{2}+\frac{b}{3}\right]^2$

$= \left[\frac{\square}{\square}\right]^2 + 2\frac{\square}{2} \times \frac{b}{\square} + \left[\frac{\square}{\square}\right]^2$

$= \frac{a^2}{\square} + \frac{\square}{6} + \frac{\square}{9}$

2) खालील त्रिकूट पायथागोरसचे आहे का ते ठरवा.

2, 6, 7

$(\text{कर्ण})^2 = (\text{एका बाजूचा})^2 + (\text{दुसऱ्या बाजूचा})^2$

$7^2 = \square^2 + \square^2$

$\square = \square + \square$

$\square \neq \square$

यावरून 2, 6, 7 हे पायथागोरसचे त्रिकूट $\square$

3) 12 से.मी. लांबी, 10 से.मी. रूंदी व 5 से.मी. उंची असलेल्या इष्टीकाचितीचे एकूण पृष्ठफळ किती?

इष्टीकाचितीचे पृष्ठफळ = 2 (लांबी x $\square$ + रूंदी x $\square$ + $\square$ x उंची)

= 2 ($\square$ + $\square$ + $\square$)

= $\square$ x $\square$

= $\square$ चौ.से.मी.

4) एका वर्तुळाचा परीघ 176 से.मी. आहे तर त्याची त्रिज्या काढा?

वर्तुळाचा परीघ = $\square$ x $\square$

$176 = \frac{22}{7} \times \square$

$\frac{176 \times 7}{\square} = \square$

व्यास = $\square$

$$\text{त्रिज्या} = \frac{\text{व्यास}}{\square}$$

त्रिज्या = $\square$

**प्र.3 रा - अ) खालीलपैकी कोणतेही 2 प्रश्न सोडवा. (गुण 2)**

1) $(a - b)^2$ चा विस्तार कोणता?

1) $a^2 + 2ab + b^2$ 2) $a^2 - ab + b^2$

3) $a^2 - 2ab + b^2$ 4) $a^2 + 2ab - b^2$

2) $p^2 - q^2$ चे अवयव निवडा.

1) (p + q) (p + q) 2) (p - q) (p + q)

3) (p x q) (p ÷ q) 4) (p - q) (p - q)

3) सुत्र पूर्ण करा.

$$\text{सरासरी} = \frac{\text{दिलेल्या माहितीमधील सर्व प्राप्तांकाची बेरीज}}{\text{------------------------------}}$$

1) एकूण प्राप्तांकाचा गुणाकार 2) एकूण प्राप्तांकाची बेरीज


3) प्राप्तांकाची सरासरी 4) एकूण प्राप्तांकाची संख्या

**प्र.3 रा - ब) खालील प्रश्न सोडवा. (कोणतेही चार) (गुण 8)**

1) एका त्रिकोणाची उंची 3.6 से.मी. व पाया 4.8 से.मी. आहे तर त्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ किती?

2) 7.2 से.मी. घनाची बाजू असल्यास त्याचे एकूण पृष्ठफळ काढा.

3) खालील आकृतीत '$x$' ची किंमत काढा.




4) विस्तार सुत्राचा उपयोग करून किंमत काढा.

$(102)^2$

5) एका वर्तुळाकृती जागेची त्रिज्या 7.7 मीटर आहे. जागेच्या भोवती तीन पदरी तारेचे कुंपण करायचे असल्यास किती लांबीची तार लागेल?


6) विदर्भात 5 वर्षात पडलेल्या पावसाची नोंद खाली दाखविली आहे. त्यावरून पावसाची 5 वर्षातील सरासरी काढा.

900 मी.मी., 650 मी.मी., 450 मी.मी., 733 मी.मी., 400 मी.मी.

**प्र.4 था - खालील प्रश्न सोडवा. (कोणतेही 2) (गुण 10)**

1) बागेतला पालापाचोळा ट्रॉलीवरून वाहून नेण्यासाठी झाकण नसलेली पत्र्याची पेटी तयार करायची आहे. तिची लांबी 1.5 मी. रूंदी 1 मी. व उंची 1 मी. आहे. त्यासाठी एकूण किती पत्रा लागेल? ती पेटी आतून व बाहेरून गंजविरोधक रंगाने रंगवायची आहे. तर 150 रू. प्रति चौरस मिटर प्रमाणे पेटी रंगविण्यास किती खर्च येईल?

2) शेजारील आकृतीत दाखवल्याप्रमाणे मापे असलेल्या बागेची परिमिती व क्षेत्रफळ काढा.




3) जया, सीमा, निखील आणि निलेश यांनी व्यवसायासाठी 3:4:7:6 या प्रमाणात 360000 रूपयांची भागीदारी केली. तर जयाचे भांडवल किती रूपये होते? त्यांना या व्यवहारात 12% नफा झाला. तर निखीलच्या वाट्याला नफ्यातील किती रू. येईल?

**प्र.5 वा - खालीलपैकी कोणताही एक प्रश्न सोडवा. (गुण 4)**

1) 290 नाणी असलेल्या पिशवित 5 रू., 2 रू. व 1 रू. ची नाणी असून त्यांचे गुणोत्तर 1:4:5 असे आहे तर पिशवित एकूण किती रूपये आहेत?

2) 30 मी. लांबी व 25 मी. रूंदीच्या भूखंडावर लांबीला समांतर 3 मी. रूंदीचा व रूंदीला समांतर 2 मी. रूंदीचे 2 रस्ते तयार केलेले आहे. तर रस्ते वगळता इतर भूखंडाचे क्षेत्रफळ किती असेल?

**प्र.6 वा - खालील प्रश्न सोडवा. (कोणताही 2)** **(गुण 6)**

1) तीन संख्यांची सरासरी 31 आहे. त्यातील एक संख्या 26 असेल तर इतर 2 संख्या कोणत्या असू शकतील?

2) समान परिमिती असणारा आयत व चौरस घेतला तर कोणत्या आकृतीचे क्षेत्रफळ जास्त असेल? तुमचे मत पटवून देण्यासाठी एक उदाहरण द्या.

3) 3 से.मी. त्रिज्या असणारे वर्तुळ काढा व त्यामधे $130^0$ चा केंद्रीय कोन काढून वर्तुळाच्या विशालकंसाचे माप किती व लघुकंसाचे माप किती ते लिहा. आवश्यक त्या जागी आकृतीमध्ये बिंदूंना नावे द्या.

# संकलित मूल्यमापन चाचणी क्र. २ - २०१८-१९

## इयत्ता : सातवी

## विषय : सामान्य विज्ञान (मराठी माध्यम)

विद्यार्थ्यांचे नांव : .................................................... हजेरी क्रमांक : ....................

शाळेचे नांव : .................................................... तुकडी : ....................

केंद्र : ............................ ता. .................... जि. .................... दिनांक :

एकुण गुण : प्राप्त गुण :

| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | प्रात्य. | तोंडी | एकुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | |
| कमाल गुण | १० | १० | १० | १० | १० | ५ | ५ | ६० | |

तोंडी चाचणीची उत्तरे येथे लिही. (प्रत्येकी १ गुण)

१) ....................................................................................................

....................................................................................................

२) ....................................................................................................

....................................................................................................

३) ....................................................................................................

....................................................................................................

४) ....................................................................................................

....................................................................................................

५) ....................................................................................................

....................................................................................................

# लेखी चाचणी

**सूचना – ज्या उपप्रश्नांच्या पुढे (गुण २) असे लिहीले आहे ते उपप्रश्न २ गुणांसाठी आहेत. उर्वरित सर्व उपप्रश्न प्रत्येकी १ गुणासाठी आहेत.**

**प्रश्न क्र.१ – खालील उपप्रश्न दिलेल्या सूचनेप्रमाणे सोडव.**

**अ व ब प्रश्नाच्या उत्तराचा योग्य पर्यायाचा क्रमांक चौकटीत लिही.**

अ) ______________________ हा सजीवांचा पायाभूत घटक आहे.

१) उती  २) इंद्रिय  ☐

३) पेशी  ४) इंद्रियसंस्था

ब) खालील पर्यायातील सुक्ष्मजीव ओळख.

१) कोळी  २) अमीबा  ☐

३) गोगलगाय  ४) मूंगी

क) पहिल्या जोडीतील सहसंबंध ओळखून त्याप्रमाणे दुसरी जोडी तयार कर.


टायलीन : लालग्रंथी  : : पित्तरस : ______________________

ड) गटात न बसणाऱ्या शब्दाला गोल कर.

१) जठर  २) हृदय

३) गर्भाशय  ४) आतडे

इ) खालील आकृतीचे निरीक्षण करून पेशी ओळखून लिही.




______________________________________________

______________________________________________

फ) शरीरातील सर्वात मोठ्या ग्रंथीचे नाव लिही.

..........................................................................................................

ग) तंबाखू सेवनामुळे होणारे चार विकार लिही. **(गुण २)**




ह) स्वच्छतेवर आधारीत कोणतेही दोन घोषवाक्ये लिही. **(गुण २)**

..........................................................................................................

..........................................................................................................

**प्रश्न क्र.२ – खालील उपप्रश्न दिलेल्या सुचनेप्रमाणे सोडव.**

**अ व ब उपप्रश्नातील रिकाम्या जागी योग्य पर्याय लिही.**

अ) आतापर्यंत शास्त्रज्ञांनी .............................. मूलद्रव्यांचा शोध लावला

१) ९२ २) ९८ ३) १०८ ४) ११८

ब) तांब्याच्या वस्तुवर .............................. रंगाचा थर तयार होतो या क्रियेस धातूचे क्षरण म्हणतात.

१) काळा २) लालसर

३) हिरवट ४) पांढरा

क) दिलेले विधान चूक किंवा बरोबर ते लिही.

''मूलद्रव्याच्या लहान कणांना अणू असे म्हणतात.'' ..............................

ड) धातुसदृश म्हणजे काय ते लिही?

..........................................................................................................

..........................................................................................................

इ) गटात न बसणाऱ्या शब्दाला गोल कर.

१) फॉस्फरस २) सल्फर ३) क्लोरीन ४) सिलीकॉन

फ) जॉन डॉल्टन यांनी मधे अणूसिद्धांत मांडला.

१) १८०१ २) १८०२ ३) १८०३ ४) १८०४

ग) कोरडा रूमाल पाण्यात बुडवला तर लगेच ओला होतो, परंतु ओला रूमाल वाळण्यास **(२ गुण)**
वेळ लागतो असे का?

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

ह) रंजकद्रव्य पृथक्करण पद्धत म्हणजे काय? त्याचा उपयोग कोठे होतो? **(२ गुण)**

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

**प्रश्न क्र.३ – खालील उपप्रश्न दिलेल्या सुचनेप्रमाणे सोडव.**

अ) गटात न बसणाऱ्या शब्दाला गोल कर.

१) अश्वगंधा २) शतावरी ३) साग ४) आवळा

ब) C N G चे पूर्ण नाव लिही.

..............................................................................................................

क) रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय निवड.

.............................. साबण कपडे धुण्यासाठी वापरतात. (मृदू / कठीण)

ड) चुण्याचे शास्त्रीय नाव लिही.

..............................................................................................................

इ) निताने तिच्या गावामध्ये सौर दिवे व बायोगॅसचा वापर जास्तीत जास्त करण्याकरिता गावकऱ्यांना प्रोत्साहन दिले व त्याचा उपयोग करण्यासाठी सुचविले कारण –

१) इतर स्त्रोत जसे लाकूड, रॉकेल उपलब्ध नव्हते २) हे सर्वात स्वस्त आहे म्हणून

३) ह्याचा वापर करायला सोपे जाते

४) सौर उर्जा व बायोगॅस हे उर्जेचे न संपणारे स्त्रोत आहेत

फ) सिमेंट तयार करण्यासाठी खालीलपैकी कोणता घटक वापरत नाही ते ओळखून योग्य पर्यायाला गोल कर.

१) सिलीका　　　　२) कॅल्शिअम कार्बोनेट

३) ॲल्युमिनिअम　　　　४) मॅग्नेशिअम


ग) जंगलाचे संरक्षण करण्यासाठी तुम्ही कोणत्या उपाययोजना कराल? **(२ गुण)**

..............................................................................................................

..............................................................................................................

